**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ९३९/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.गोटू दत्तू पुजारी,
रा. वेवूर, मनोर रोड,
ता.जि.पालघर ४०१ ४०४

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय पालघर, पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय पालघर, पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १३/१०/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ७/१२/२०२१ | ---- | २५/१/२०२२ | ३/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२३/३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/१०/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.तानाजी शिंदे, पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय पालघर उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.रोशन संखे सध्या कार्यरत-नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" पालघर तालुक्यातील रेशनिंग कार्ड धारकांचे शुभ्र कार्ड केशरी कार्ड यांना प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थींची नोंद असलेल्याची यादी व तसेच शुभ्र कार्ड रद्द करुन केशरी कार्ड देण्यात आलेल्याची यादी उत्पन्न दाखला, घरपट्टी देण्यात यावी प्राधान्य कुंटुंबाचे लाभार्थी चा शिक्का मारणाऱ्या ठेकेदारांची नावाची यादी व सक्षम अधिकाऱ्यांची नाव देण्यात यावी व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.३/३/२०२२ रोजी, *"जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिलदार कार्यालय पालघर यांनी अपिलार्थी यांस आवश्यक माहिती १५ दिवसांत पुरविणेत यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसून येते की, तक्रारकर्ता यांना विहीत मुदतीत व प्रथम आदेशानंतरही माहिती दिली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.रोशन संखे, पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय पालघर यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ७/१२/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी <u>दि.१७/११/२०२५</u> रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.रोशन संखे, पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय पालघर **<u>- यांना प्रत</u>** --
--तहसिलदार पालघर,
तहसिलदार कार्यालय पालघर,
पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि.पालघर ४०१ ४०४. **<u>यांचेमार्फत रवाना.</u>** (तहसिलदार यांनी सदरची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास पोस्टाने सादर करावी)